| MHKO050045812019 | श्रीमती सकीना लालखान लाड वगैरे<br>विरुध्द<br>श्री.रफिक निजाम सनदी वगैरे |
|---|---|

**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ३४२/२०१९ मधील</u>**

**<u>निशाणी क्रमांक ५ वरील आदेश</u>**

सदरचा अर्ज वादीने प्रतिवादीविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १, २ कलम १५१ प्रमाणे तुर्तातूर्त मनाई देवविण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीच्या कथनानुसार, जिल्हा तुकडी कोल्हापूर, तालुका पोटतुकडी हातकणंगले पैकी मौजे कोरोची गावातील मिळकती क.ग.नं.९५५ क्षेत्र हे.०.४९ आर आकार रु.१.५० पै.ची संपूर्ण गटाची शेतजमीन, क.ग.नं.९४८ क्षेत्र हे.०.५४ आर आकार रु.६.०० पै.ची संपूर्ण गटाची शेतजमीन, क.ग.नं.५६२ क्षेत्र हे.०.०३ आर आकार रु.०.०९ पै.ची संपूर्ण गटाची शेतजमीन आणि मौजे कोरोची येथील सि.स.नं.५४८ क्षेत्र १०७.६ चौ.मी. ची घरमिळकत याचा कोरोची ग्रामपंचायत मिळकत नं.४७३, ४७४, ४७५ असा आहे. याची दावा अर्ज कलम १ मध्ये चतु:सीमा पूर्वक वर्णन केलेली मिळकत ही दावा मिळकत आहे. दावा मिळकत ही वादीचे वडील कै.कमाल बाळा सनदी यांची वाडवडिलार्जित मालकी हक्काने आलेल्या व कब्जावहिवाटीच्या मिळकती आहेत. वादीचे वडील कै.कमाल बाळा सनदी हे ता.४/७/१९९७ रोजी मयत झाले आहेत व आई कै.जैतून कमाल सनदी हया ता.१/८/२००१ रोजी मयत झाली आहे. त्यांचे पश्चात वादी व प्रतिवादी क्र.१ ते ६ हे सरळ व कायदेशीर वारस होते व आहेत. दावा मिळकतीमध्ये वादी यांचा सामाईक व अविभाज्य हिस्सा होता व आहे. वादीचे वडील मयत झालेनंतर प्रतिवादी नं.१ ते ६ व त्यांचे पूर्वहक्कदार हे दावा मिळकत कसून उत्पन्न घेत होते. साधारण एक महिनेपूर्वी प्रतिवादी नं.१ ते ६ यांनी दावा मिळकत पैकी शेतजमीन विक्री केले असलेबाबत वादीस समजले. वादीनी दावा मिळकतीचे ७/१२ पत्रक काढून बघितले असता त्यांना क.ग.नं.९५५ ला फेरफार नं.२०९५३ ने प्रतिवादी नं.७ चे नांव मालकी हक्कात २६ गुंठे क्षेत्रास लागले असल्याचे दिसून आले. वादीनी माहिती घेतली असता प्रतिवादी नं.१, ३ ते ६

यांनी संगनमत करुन वादीचे संमतीविना त्यांचे अपरोक्ष दावा मिळकतीपैकी (१)(अ) शेतजमीनीपैकी हे.०.२६ आर आकार रु.०.७९ पै.ची जमीन प्रतिवादी नं.७ ला कायम खूषखरेदी दिल्याचे समजले. वस्तुतः प्रतिवादींना सदर मिळकतीमध्ये असलेला वादींचा हक्क व अधिकार डावलून सदरची मिळकत खरेदी देणेचा कायदेशीर हक्क व अधिकार नाही. वादींनी दावा मिळकतीमध्ये असलेली कायदेशीर हक्क व हिस्सा वाटणी करुन देणे बाबत विचारणा केली असता प्रतिवादीनी दावा मिळकतीची वाटणी करुन कब्जा देणेस टाळाटाळ केली. प्रतिवादी यांनी दावा मिळकत (१)(अ) मध्ये २६ गुंठे क्षेत्रास सातबारा पत्रकी त्यांचे नांवाची नोंद झाल्याचा गैरफायदा घेवून सदर मिळकत तबदीली, हस्तांतरण करणेचा प्रयत्न चालू केला असलयाचे वादी यांना खात्रीलायकरित्या समजून आले आहे. त्यामुळे या दाव्याच्या निकालापर्यंत प्रतिवादींनी दावा मिळकत त्रयस्थ इसमांना तबदील हस्तांतरण करु नये, कर्ज बोजे करु नयेत, दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचे हक्क, हितसंबंध निर्माण करु नये अशी तुर्तातूर्त ताकिद देवविण्याची विनंती केली.

३. प्रतिवादी क्र. १, ३ ते ६ यांनी निशाणी २३ कडे कैफियत व तुर्तातूर्त ताकिद अर्जास म्हणणे देवून अर्जास विरोध दर्शविला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, वादीचा दावा खोटा व लबाडीचा असून प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. वादी व प्रतिवादीचे पूर्वहक्कदार कमाल बाळा सनदी यांच्या मृत्यूनंतर प्रतिवादीचे पूर्वहक्कदार बाबासो कमाल सनदी, निजाम कमाल सनदी व साहेबजी कमाल सनदी यांच्या दरम्यान व वादी यांचे दरम्यान तत्कालीन म्हणजेच सन १९९७ नंतर आपसात तडजोडीने वादी यांना प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार बाबासो कमाल सनदी, निजाम कमाल सनदी यांनी योग्य ती रक्कम व अन्य आहेर माहेर केला व वादी यांनी दावा मिळकतीमधील हक्क कायमस्वरुपी सोडून दिला होता. तेव्हापासून प्रतिवादीचे पूर्वहक्कदार व त्यांचेनंतर प्रतिवादी हे दावा मिळकत स्वतंत्र मालकी हक्काने उपभोगत होते व आहेत. प्रस्तुत प्रतिवादी यांना प्राप्त असलेल्या कायदेशीर मालकी हक्काद्वारे एकत्र कुटूंबाच्या आर्थिक अडचणीचे निवारण करण्याकरीता, औषधोपचाराकरीता, काही हातउसनवार व्याजाने पैसे घेतलेल्या तसेच अन्य वित्तीय संस्थेचे देणे भागविणेकरीता दि.५/४/२०१९ रोजी नोंदणीकृत खरेदीदस्त नं.२०२९/२०१९ ने वर नमूद दावा मिळकत प्रतिवादी नं.७ यांना विक्री केली आहे. त्यामुळे या व्यवहाराबद्दल कायदेशीर वाद निर्माण करणेचा कोणताही अधिकार वादी यांना प्राप्त होत नव्हता व नाही. सन १९९७ नंतर वादी यांचा असलेला हक्क कायमस्वरुपी नष्ट झालेला आहे. वादीचा

दावा कायद्याने चालणेस पात्र नाही. या कारणावरुन प्रतिवादींनी अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली.

४. वादीतर्फे विद्वान वकील श्री .सामानगडकर, प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री.बी.आर.पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली.

५. वादी, प्रतिवादीचे वादकथन, कागदपत्रे, युक्तीवाद यावरुन खालील मुद्दयांचे कारणासह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीस प्रथमदर्शनी केस आहे काय ? | **होकारार्थी** |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या वतीने आहे काय? | **होकारार्थी** |
| ३. | वादीच्या मागणीप्रमाणे तूर्तातूर्त ताकिद दिली नाही तर वादीचे नुकसान होईल काय ? | **होकारार्थी** |
| ४. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणे

**मुद्दा क्र. १ ते ३**

६. पुनरोक्ती टाळण्यासाठी मुद्दा क्र १ ते ३ ची कारणे एकत्रित चर्चिली आहेत.

७. प्रतिवादीनी दावा मिळकत दाव्याच्या निकालापर्यंत तबदील, हस्तांतरण करु नये, कर्जबोजे करु नयेत अथवा त्रयस्थ पक्षकारांचे हक्क हितसंबंध निर्माण करु नयेत अशी निरंतर ताकिद देवविण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादीं क्र.१, ३ ते ६ यांनी निशाणी २३ कडे कैफियत व म्हणणे दाखल केले आहे. वादीतर्फे अर्जाच्या पृष्ठयर्थ लेखी युक्तीवाद दाखल करणेत आला आहे. दावा मिळकतीचे वर्णन, वंशावळ, दावा मिळकतीचे वडिलार्जित स्वरुप उभय पक्षांना मान्य आहे. वादीचा असा युक्तीवाद आहे की,वादी यांचा दावा मिळकतीमध्ये मुस्लीम वारसा कायद्याप्रमाणे हक्क व हिस्सा आहे. वादी व प्रतिवादीमध्ये सरसनिरस मानाने वाटणी झालेली नाही. वादी यांनी हक्क सोडलेबाबत कोणताही लेखी व तोंडी पुरावा प्रतिवादी यांनी हजर केलेला नाही. त्यामुळे या कामी तुर्तातुर्त मनाई दिली गेली नाही तर प्रतिवादी हे अगर अन्य प्रतिवादी दावा मिळकतीची विक्री अगर त्रयस्थ इसमांचे हक्क निर्माण करुन दाव्यामध्ये

गुतागुंत निर्माण होण्याची शक्यता आहे. वादीला प्रथमदर्शनी केस आहे. न्यायाचा समतोल वादीच्या वतीने आहे. वादीच्या मागणीप्रमाणे तुर्तातूर्त मनाई दिली नाही तर वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे. त्यामुळे वादीचा तुर्तातुर्त मनाई अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे–

## <u>आदेश</u>

१. निशाणी ५ कडील अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. या दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत प्रतिवादीने दावा मिळकतीची विक्री, कर्जबोजा, करार अगर अन्य प्रकारे त्रयस्थ इसमांचे हक्क निर्माण करु नयेत, अशी प्रतिवादीला तुर्तातूर्त ताकिद देण्यात येते.

३. खर्चाबाबत आदेश नाहीत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
Ganesh Arun Karajgar
Date: 2022.01.15
17:57:42 +0530

ठिकाण – इचलकरंजी.
दिनांक – ३१/१२/२०२१

(जी. ए. करजगार)
६ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
इचलकरंजी, जि.कोल्हापूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | S.A.Sayyad |
| Name of Court | Judicial Magistrate First Class, Court No.6, Ichalkaranji. |
| Date of Dictation | 31/12/2021 |
| Judgment Signed by the P.O. on | 31/12/2021 |
| Judgment uploaded on | 31/12/2021 |